डिसेंबर २०१७ मध्ये आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीपोटी बाधितांना मदत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सीएलएस-२०१७/प्र.क्र.३२०/म-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
तारीख: २१ फेब्रुवारी , २०१८

वाचा -

१) **शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस - २०१५ / प्र.क्र.४० / म-३, दिनांक १३.५.२०१५**

प्रस्तावना -

दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ या कालावधीत राज्यात आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे व त्यामुळे आलेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या बाधितांना मदत मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर घटनांमध्ये बाधित झालेल्या आपदग्रस्तांना या शासन निर्णयात पुढे नमूद केल्याप्रमाणे मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शासन निर्णय -

दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ या कालावधीत राज्यात आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या बाधितांना खालील दराने मदत देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. **मच्छिमार बोटींचे व जाळींच्या नुकसानीसाठी मदत :**

अ.क्र.	नुकसानीचा प्रकार	मदतीचे दर
१.	बोट,होडी,यांत्रिकी बोट यांच्या अंशत: दुरूस्तीसाठी	रू.४१००/-
२.	पूर्णत: नष्ट झालेल्या बोट,होडी,यांत्रिकी बोट यासाठी	रू.९६००/-
३.	अंशत: बाधित झालेल्या जाळयासाठी	रू २१००/-
४.	पूर्णत: नष्ट झालेल्या जाळयासाठी	रू.२६००/-

बाधितांना मदतीचे वाटप करताना खालील अटी व शर्ती यांची पुर्तता होणे आवश्यक राहील:

१) मत्सव्यवसाय विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे करण्यात यावेत.
२) मदतीची रक्कम संबंधित बाधितांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात यावी. कोणत्याही बाधितांना रोख अथवा निविष्ठा स्वरूपात मदत देण्यात येऊ नये.
३) झालेल्या नुकसानीकरीता मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खात्यावर थेट जमा करतांना मदतीच्या रक्कमेमधून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करु नये.
४) या आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीपोटी राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही विभागाकडून अन्य कोणत्याही योजनेखाली अनुदान/मदत मिळाली असल्यास त्यांना वरील मदत अनुज्ञेय असणार नाही.

३. शेती पिकांच्या व बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी मदत :

दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ या कालावधीत ओखी चक्रीवादळामुळे पिकांचे व बहुवार्षिक पिकांचे ३३% किंवा त्यापेक्षा अधिक नुकसान झालेल्या प्रकरणी खालील दराने बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) <u>२ हेक्टरपर्यंत जमीन धारण करणारे शेतकरी</u>

अ.क्र.	पिकाचा प्रकार	मदतीचे दर
१	कोरडवाहू क्षेत्र	रू.६८००/- प्रति हेक्टर परंतु पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत. मदतीची किमान रक्कम रू.१००० पेक्षा कमी असणार नाही
२.	बागायत क्षेत्र	रू.१३५००/- प्रति हेक्टर परंतु पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत. मदतीची किमान रक्कम रू.१००० पेक्षा कमी असणार नाही
३.	बहुवार्षिक पिके	रू १८०००/- प्रति हेक्टर. सदर मदत प्रत्यक्ष पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत अनुज्ञेय असून कमीत कमी मदत रू. २०००/- पेक्षा कमी असणार नाही .

२) <u>२ हेक्टरपेक्षा अधिक जमीन धारण करणारे शेतकरी</u>

अ.क्र.	पिकाचा प्रकार	मदतीचे दर
१	कोरडवाहू क्षेत्र	रू.६८००/- प्रति हेक्टर पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत व अधिकतम २ हेक्टरच्या मर्यादेत
२.	बागायत क्षेत्र	रू.१३५००/- प्रति हेक्टर पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत व अधिकतम २ हेक्टरच्या मर्यादेत
३.	बहुवार्षिक पिके	रू.१८०००/- प्रति हेक्टर पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत व अधिकतम २ हेक्टरच्या मर्यादेत

३) बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करताना खालील अटी व शर्ती यांची पुर्तता होणे आवश्यक राहील:

१) शेती व फळपिकांचे ३३% किंवा त्यापेक्षा अधिक नुकसान झालेल्या प्रकरणी बाधित शेतकऱ्यांना मदत अनुज्ञेय राहील.

२) शेती व फळपिकांचे ३३% किंवा त्यापेक्षा जास्त नुकसान झालेल्या प्रकरणी करण्यात आलेल्या पंचनाम्याच्या आधारे नुकसानीची खात्री करून मदतीचे वाटप करण्यात यावे.

३) मदतीची रक्कम संबंधित बाधितांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात यावी. कोणत्याही बाधितांना रोख अथवा निविष्ठा स्वरूपात मदत देण्यात येऊ नये.

४) शेती पिकांच्या व बहुवार्षिक पिकांच्या झालेल्या नुकसानीकरीता मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खात्यावर थेट जमा करतांना मदतीच्या रक्कमेमधून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करु नये.

५) पिकाची व बहुवार्षिक पिकांची नोंद ७/१२ मध्ये असणे आवश्यक राहील. बागायती क्षेत्राची नोंद देखील ७/१२ मध्ये असणे आवश्यक राहील.

४. हे आदेश प्रशासकीय मान्यतेचे असून शेतीपिकांच्या नुकसानीसाठी निधी वितरणाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. मच्छिमार बोटींच्या व जाळीच्या नुकसानीसाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी तात्काळ करण्यात यावी.

५. या प्रयोजनावर होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष - २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य या लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२११६०७३७२७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024,
serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.02.21 16:08:09 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई ,
३. मा विरोधी पक्ष नेते, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन,मुंबई,
४. महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
५. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई,
७. प्रधान सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई,
८. सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई,
९. विभागीय आयुक्त,कोकण/नाशिक,
१०. आयुक्त (कृषी),महाराष्ट्र राज्य,पुणे,
११. आयुक्त (मत्सव्यवसाय),महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. जिल्हाधिकारी, पालघर/रायगड/रत्नागिरी/ठाणे/सिंधुदुर्ग/धुळे/नाशिक/नंदुरबार,
१३. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पालघर/रायगड/रत्नागिरी / ठाणे/सिंधुदुर्ग /धुळे / नाशिक/ नंदुरबार,
१४. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई,
१५. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई,
१६. सहसचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन विभाग,
१७. कार्यासन म-११, मदत व पुनर्वसन विभाग,
१८. निवड नस्ती (कार्यासन - म/३)